


# प. पू. दिलीप वासुदेव आपटे

## संस्थापक

।। गीता फाऊंडेशन ।।

(यतन्तश्च दृढव्रताः)

पत्ता- चैतन्य, लोकमान्य सोसायटी, पंढरपूर रोड, मिरज - ४१६४१० मो. ८६२५० ३२०८२



३२ वर्षे बँकेत नोकरी केल्यानंतर त्यांनी वयाच्या ५१ व्या वर्षी - १९९८ साली **श्रीमद्भगवद्गीता व श्रीमद्भागवत महापुराण – पर्यायाने भागवत धर्माचा प्रसार करणे** हे कारण नमूद करून नोकरीचा राजीनामा दिला व वानप्रस्थाश्रम स्वीकारला.

त्याच्या पूर्वी अगदी त्याच काळात त्यांची भेट एका ज्ञानशिबिरात चिन्मय सेवा ट्रस्टचे **स्वामी तेजोमयानंद** यांच्या बरोबर चेन्नई येथे झाली होती व त्या भेटीत त्यांनी (आपटे काकांनी) स्वतःचा मानस व्यक्त केला व त्यांच्याकडून प्रेरणा घेतली.

त्यानंतर त्यांनी सतत ५ वर्षे घरात बसूनच **श्रीमद्भगवद्गीता, श्रीमद्भागवतमहापुराण, ब्रह्मसूत्र, उपनिषदे इत्यादि चा सखोल व प्रदीर्घ अभ्यास** केला.

* नंतर २००३ सालापासून गीता, भागवत, उपनिषदे इ. ग्रंथांवर महाराष्ट्रभर प्रवचने, भागवत कथा व भागवत संहिता वाचन इत्यादि ची सुरूवात केली.

* त्यांनी या ग्रंथांचा पर्यायाने भागवत धर्माचा प्रसार करण्याच्या हेतुने, **२००३ साली गीता फाऊंडेशन, मिरज** या संस्थेची स्थापना केली. समाजाच्या आध्यात्मिक व सामाजिक प्रगतीसाठी ही संस्था कार्यरत आहे.

* केवळ **अध्यात्म प्रसारासाठी २००६ पासून धर्मयज्ञ नावाचे मासिक** त्यांनी सुरू केले. यात गीता, भागवत, उपनिषदे इत्यादि वर त्यांचे स्वतःचे लेख असतात. मासिकाला वर्गणी नाही पण फक्त वाचकांच्या देणग्यावर हे मासिक चालू आहे. याचा वाचक वर्ग ८००० च्या पेक्षा जास्त – मोठ्या प्रमाणावर आहे. E-mail वर सुध्दा हे मासिक उपलब्ध होऊ शकते.




* भागवत महापुराण समाजात पोचवण्याच्या उद्देशाने, **भागवत परिचय अभ्यासक्रम** पुस्तिका तयार करून साधकांना घर बसल्या भागवताचा अभ्यास करण्यासाठी प्रेरणा दिली. हा एक वर्षाचा अभ्यासक्रम आतापर्यंत ५०००च्या वर साधकांनी पूर्ण केला आहे.

त्याचप्रमाणे **४ वर्षाचा भागवत सखोल अभ्यासक्रम (पत्राद्वारे)**, सुरू करून भागवत

महापुराणाबद्दल साधकांमध्ये आवड निर्माण केली. महाराष्ट्रात खूप ठिकाणी या अभ्यासक्रमासाठी अभ्यास वर्ग सुरू केले.

**<u>* श्रीमद्भागवतमहापुराण</u>** - साधकाना भागवत संहिता (संस्कृत ) म्हणता यावी यासाठी मार्गदर्शन केले. डोंबिवली, पुणे, पावस अशा विविध ठिकाणी भागवत पारायण आयोजित केले.

* **श्रीमद्भागवतमहापुराण – दशम स्कंध** स्वाहाकार–हवनाचे कार्यक्रम द्वारका, वृंदावन, नृसिंहवाडीसह महाराष्ट्रात विविध ठिकाणी संपन्न केले.

* **भागवतातील एकादश स्कंध** सगळ्यांना म्हणता यावा या उद्देशाने - पठणाच्या Audio clips स्वतः म्हणून साधकांपर्यत पोचविल्या व जवळजवळ २००० साधकांना एकादश स्कंध व्यवस्थित म्हणण्यासाठी प्रेरीत केले. गीता फाऊंडेशन, मिरज यांच्या तर्फे पंढरपूर, आळंदी इत्यादि अनेक ठिकाणी पठणाचे कार्यक्रम आयोजित केले गेले.

* श्रीमद्भागवत महापुराणातील महत्वाची तत्वे सर्व साधकांपर्यंत पोचवावीत या उद्देशाने जुलै २०१७ पासून साधारण १५ मिनिटांच्या Audio clips द्वारे व्हाट्सअप च्या व You Tube च्या माध्यमातून पाठवण्याची व्यवस्था केली. तसेच व्हाट्सअप व टेलेग्राम चॅनेल द्वारे आदरणीय श्री दिलीप आपटे काकांच्या प्रवचनांचे ऑडिओ एकदिवसाआड पाठवले जातात.

* गीता व कठोपनिषद यावरील आदरणीय आपटे काकांची चिंतने (त्यांच्या हस्ताक्षरातील) रोज व्हाट्सअपवर पाठिवली जातात

* महाराष्ट्रात श्रीविष्णू सहस्रनाम पठणाचे कार्यक्रम सर्वत्र आयोजित केले. गेली ८ – १० वर्षे सातत्याने श्रीविष्णू सहस्रनाम कार्यक्रम पुणे, मुंबई व इतरत्र चालू असतात.

* श्रीविष्णू सहस्रनामाचा २५ लाख आवर्तनाचा संकल्प २०१५-१६ मध्ये हजारो जणांकडून पूर्ण करून घेतला.

* गीता फाऊंडेशन, मिरज यांनी **गीता गुरुकुल App** हे विकसित केले आहे. त्यात आपणास खाली नमूद केलेल्या ग्रंथांच्या प.पू. आपटेकाकांनी म्हणलेल्या Audio ऐकायला मिळतील.

१ श्रीविष्णूसहस्रनाम
२ श्रीमद् भगवद्गीता - संपूर्ण
३ श्रीमद्भागवत महापुराण -(संस्कृत) संहिता - अध्याय १ ते ८
४ दासबोध संपूर्ण
५ महाभारत - *शांतीपर्व* - अध्याय १७४ ते ३६५

**गीता गुरुकुल App**, Google Play Store वर मोफत उपलब्ध आहे. साधकांनी श्रवणाचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.



* **१२ कोटी श्रीविष्णू सहस्रनामाचा संकल्प दि. १ जाने. २०१९** रोजी केला. **उद्देश - दुसऱ्याचे नि:श्रेयस करण्याची, चांगले करण्याची, त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याची वृत्ती दृढ व्हावी.** सध्या त्यात **२५४०० च्या** वर लोकांनी नावे नोंदवली आहेत व **आवर्तने ३ कोटी ६६ लाखाच्या** वर (दि. १-१०-२०२१ रोजी) झाली आहेत. आपणही यात सहभागी व्हावे ही नम्र विनंती. खालील web-site वर आपण आपले नाव नोंदवू शकता .www.shrivishnusahasranaam.com

**<u>** प.पू. आपटे काकांचे ग्रंथ लेखन कार्य **</u>**




- **श्रीमद्भगवद्गीता सार पुस्तिका**
- **गीतायज्ञ**
- **श्रीविष्णूसहस्रनाम (विस्तृत अर्थासहित)**
- **भागवतधर्म सार**
- **कैवल्योपनिषद**
- **योगतारावली**

असे ग्रंथ लिहून प्रसिध्द केले.

* **प.पू. आपटे काकांनी,**

* **श्रीमद्भगवद्गीता (१८ अध्याय)** * **श्रीमद्भागवतमहापुराण (स्कंध १ ते ८) ,**

* **भीष्म शांतीपर्व** इत्यादि स्वतः म्हणून त्याच्या Audio clips – You Tube वर साधकांसाठी उपलब्ध करून दिल्या. संबंधित **You Tube** वरील **sites** * **DilipApte** * **Geeta Foundation, Miraj**

* साधक वर्ग श्रीमद्भागवत महापुराणाशी जोडला जावा या उद्देशाने धर्मयज्ञ मासिकातून त्यांनी भागवत संहिता (संस्कृत ) लिहून काढण्याचे आवाहन केले. त्याला चांगलाच प्रतिसाद मिळाला. साधारण ४५० साधकांनी भागवत संहिता - संस्कृत - स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून आनंदाचा अनुभव घेतला. * यातील १२५ जणांनी आपली हस्तलिखित प्रत घेऊन द्वारका येथे द्वारकाधीशांच्या चरणावर अर्पण करून स्वानंदामृत अनुभवले.

## <u>गीता फाऊंडेशन, मिरज : विविध उपयुक्त माहिती</u>

१ <u>Google site --- www.shrivishnusahasranaam.com</u>

**ही साईट सभासद नोंदणी, आवर्तन नोंदणी, सभासदांचे नोंदणी क्रमांक शोधण्यासाठी, एकूण आवर्तने किती झाली पहाण्यासाठी व संस्थेशी संपर्क साधण्यासाठी उपयोगी आहे.**

२. <u>Google Geeta Foundation Miraj --- archive.org</u>

* **श्रीमद् भगवद् गीता श्लोक - audio** * **महाभारत शांतीपर्व अर्थ - भाग २ ४ व ५ audio**
* **भागवत अर्थ स्कंध ३ ४ व ५ - audio**

३. <u>Dilip Vasudeo Apte --- archive.org</u>

* **दासबोध - audio** * **भागवत अर्थ स्कंध - १ २ ३ ४ ५ ६** * **गीता श्लोक - audio**
* **महाभारत शांतीपर्व भाग १ २ ३ ४ ५** * **भागवतावरील मागील १०५ प्रवचने**
* **आगमसार अर्थ - ७० audios** * **योगवसिष्ठ अर्थ - audios चाळीस**

## त्यांच्या अध्यात्मिक कार्यामुळे त्यांना बरेच विशेष पुरस्कार मिळाले.

* **मिरज भूषण पुरस्कार - २०१३**

* स्वामी वरदानंद भारती स्थापित श्रीराधादामोदर प्रतिष्ठान यांच्या तर्फे **संत कवि दासगणू महाराज पुरस्कार – पंढरपूर येथे २०१५** साली प्रदान करण्यात आला.



* धर्मयज्ञ मासिकातील लोकमान्य टिळकांच्या वर काकांनी लिहिलेल्या लेखाच्या निमित्ताने चिन्मय सेवा ट्रस्टचे प्रमुख - स्वामी तेजोमयानंदानी गीता फाऊंडेशनला, रू. १००००/- देणगी दिली. त्यानंतर काही कालावधीतच टोप-संभापूर (कोल्हापूर जवळ) येथे त्या दोघांची भेट झाली. स्वामी तेजोमयानंद यांनी काकांच्या कार्याचा गौरव केला, पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**← प.पू. स्वामी तेजोमयानंद व प.पू. आपटे काका**



* २०१९ साली आळंदी येथील एकादश स्कंध कार्यक्रमात, संत ज्ञानेश्वर विद्यापीठ, आळंदी यांचेतर्फे **संत ज्ञानेश्वर पुरस्कार** प.पू. किशोरजी व्यास – अर्थात आचार्य गोविंददेव गिरीजी महाराज यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास १२०० साधक उपस्थित होते व सगळ्यांनी भागवत एकादश स्कंधाचे पठण केले.

* डिसेंबर २०१९ मध्ये गीता फाऊंडेशनने चार दिवसांचा भागवतकथा ज्ञानयज्ञ मिरज येथे आयोजित केला.

प.पू. आपटे काकांनी या ज्ञानयज्ञात 'भागवत धर्म' या विषयावर सखोल चिंतन श्रोत्यांसमोर व्यक्त केले.






**भागवतकथा ज्ञानयज्ञ**

मिरज येथील भागवतकथा ज्ञानयज्ञात समर्थ भक्त प. पू. मंदाताई गंधे, अमरावती; यांनी स्वत: उपस्थित राहून साधकांपुढे आपले मनोगत व्यक्त केले.



## * प. पू. आपटे काका यांचे गीता फाउंडेशन, मिरज द्वारा घडत असणारे सामाजिक कार्य

* **हुशार, परंतु शिक्षणासाठी पैशाची गरज असणा-या विद्यार्थ्यांना**



**उच्च शिक्षणासाठी** परतफेडीच्या तत्वावर **अर्थसहाय्य**.-- असे २०० च्या वर विद्यार्थी शिकून चांगल्या पदावर आहेत. सध्या ३०/ ३५ विद्यार्थी अर्थसहाय्य घेऊन शिकत आहेत. याची वार्षिक उलाढाल रू. ८ ते ९ लाख इतकी आहे.

* सरकारी शाळातून शिकणा-या गरीब –अप्रगत विद्यार्थ्यांना त्या शाळांच्या अधिकाऱ्यांच्या संमतीने त्याच **शाळेत अभ्यासवर्ग** घेतले जातात. अशा **५ शाळा दत्तक घेतल्या** आहेत. संस्था दरवर्षी एक नविन शाळेची भर टाकून या कार्यात पुढे जाते आहे.



* **गरीब व गरजू अशा ३०० कुटुंबाना दरमहा आवश्यक तेवढे धान्य** पुरवले जाते.

**अशा प्रकारे लोकोपयोगी, लोकशिक्षणार्थ, भागवतधर्म प्रसाराचे कार्य त्यांच्या कडून घडत आहे. त्यांच्या या आध्यात्मिक प्रवासात त्यांना निष्ठेने साथ देणाऱ्या, त्यांच्या धर्मपत्नी सौ. जयश्री ताई या, " धर्मेच, अर्थेच, कामेच, नातिचरामी " ही शपथ, सर्वार्थाने सार्थ करीत आहेत. तसेच आपटे काकांच्या उपक्रमांत त्यांचे दोन्ही चिरंजीव, सुना व नातवंडे यांचा सक्रिय सहभाग उल्लेखनीय आहे..**



**भारत देश हा विश्वात आध्यात्मिक महासत्ता व्हावा यासाठी मन:पूर्वक व तळमळीने कार्य करणाऱ्या आदरणीय आपटे काकांना शतशः प्रणाम. त्यांना हे कार्य करण्यासाठी उत्तम आरोग्य व आयुष्य लाभो अशा आम्हा सर्व स्वयंसेवकांच्या हार्दिक शुभेच्छा.**



**|| ॐ नमो भगवते वासुदेवाय ||**